


# युगुधाई

दीपपुजा चव्हाण

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# यमुनाई

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# यमुनाई

(कादंबरी)

लेखिका

## दीपपूजा चव्हाण

# यमुनाई


## लेखिका: दीपपूजा धनसिंग चव्हाण,

व्हाट्सएप नंबर 9850669778

पत्ता- कारपा. या. मानोरा.

जि. वाशीम. 444403 महाराष्ट्र

dipapoojac27@gmail.com



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**Whatsapp: 9987737237**

प्रकाशन : ९ फ़ेब्रुवारी २०२२

माघ शुक्ल अष्टमी शके १९४३


©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# मनोगत

नमस्कार..



मी दीपपूजा. खरं तर लहानपणी देशोन्नती मध्ये येणार झुळूक वाचता वाचता आवड निर्माण झाली. आणि ती आजपर्यंत मी अगदी आवडीने जपली आहे.. अगदीच ययाती पासून तर मृत्युंजय सारख्या कादंबरी खूप आवडतात आणि ई साहित्या मधून अजूनच वाचनात भर पडली आहे कारण कुठे पुस्तक घेऊन जायची गरज भासत नाही अगदी हवं तिथे फक्त फोन उघडायची गरज..

यमुना माझी आजी आणि आणि तिच्या कणखर व्यक्तिमत्व जगासमोर आणायच , तिच्या बद्दल लिहायचं, हा विचार मी वयाच्या 17व्या वर्षी च केला होता .. तो आता ई साहित्याच्या माध्यमांतून साकार झाले. आता पुढे खूप जग भ्रमंती करायची असून लवकरच मी आणि मी हे पुस्तक आपल्या भेटीला येईल च आणि किमान महाराष्ट्रातल्या प्रत्येक त्या विदयार्थ्याला भेटायचे आहे ज्याला शिकण्याची खूप आवड आणि जिद्द आहे .... पण परिस्थिती मुळे तो मागे आहे.

महाराष्ट्रीय संस्कृती परंपरा कायम ठेवत सगळी ठिकाण फिरायची आहे... आणि वाचन कायम ठेवत नेहमीच नवीन काही लिहायचं माझा प्रयत्न राहील. यासाठी e sahity चे खूप खूप धन्यवाद.

यमुनाई या पुस्तकातून मी पाहिलेल्या कणखर स्त्री चां जीवनप्रवास दाखवण्याचा प्रयत्न मी केला आहे. यात काही चूक असल्यास त्या पदरात घ्या काही काळापासून मी e sahity चे वाचन करत असताना माझ्यातली लेखिका जागी झाली आणि मी लिहायला सुरुवात केली.इंटरनेटच्या काळात वाचनाची आणि लिखाणाची आवड जपू पाहणाऱ्या **इ साहित्य** टीम ला माझा मनाचा मुजरा. करावी तेवढी स्तुती कमीच. आशा बाळगते की वाचकांना ह्या स्त्री चा प्रवास तुम्हाला आवडेल.

खरतर ही कणखर स्त्री म्हणजे माझी आजी. तिचे जिवन माझ्या साठी नेहमीच प्रेरणा दायी ठरला आहे. आणि मला खात्री आहे की तुम्ही सुद्धा या कथेशी जोडले जाल. या कथेतील यमुना सामान्य परिवारातील असुन तिने सगळयांना तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत बांधून ठेवले होते हाच तिचा प्रवास मी मांडला आहे.

**दीपपूजा चव्हाण,**

**M.A (history), M.A (English), B. Ed.**

हे पुस्तक यमुनाईला अर्पण

दीपपूजा चव्हाण

# यमुनाई

## एक कणखर स्त्री

# यमुनेचं लहानपण व लग्न

विदर्भातील एका दुर्गम भागात एका बंजारा तांड्यात आडे कुटुंबात यमुनाचा जन्म झाला. मुळात आई वडील अडाणी आणि त्यात भर परिस्थीती अगदीच बिकट.

6 बहिणी व 2 भाऊ आई वडील असा मोठा परिवार पण त्यांच्या आर्थिक गरजा ही पूर्ण होत नसे.. रात्री झोपतांना सकाळी खायला भेटणार का? हा प्रश्नच. यमुनेचे वडिल अडाणी त्यामुळे शाळेत जायला कुणालाच मिळाले नाही.

सगळे भाऊ बहीण शेतात काम करीत होते. कधी जेवायला मिळत तर कधी तसच झोपाव लागे तांड्यातल्या अडाणी पणामुळे सगळ्या बहिणींचे लग्न लवकरच झाले. त्यात यमुनेला कस ठेवणार म्हणुन त्याच गावातील पार्वती बाई जी लग्न करून सावरगाव गेली तिच्या मुलासाठी यमुनेला मागण आल.पार्वती बाई ओोळखीची असल्याने फारसा विचार न करता घरच्यांनी लग्नाला होकार दर्शविला. काय यमुनेच निर्णय अडाणी लोक ती येवढ कळन व्हय त्यांना आता सारख वय पण पहात नसत. याबददल आपण सगळेच जाणता. म्हणुन त्यात तर यमुना ची तर मासिक

पाळी यायच्या आधीच सावरगाव च्या राठोड कुटुंबात लग्न झाले... तिच सासर म्हणजे आताच्या भाषेत मोठे घराणे.

पिळदार मिश्या उंच शरीरयष्ठी गावात दरारा कणखर आवाज असते विश्राम नाईक म्हणजे यमुना चे सासरे. खरं तर दिसायला जरी कडक वाटत असले तरी तितकेच प्रेमळ.

घरी आलेला प्रत्येक व्यक्ती जेवुनच जावा कोणीच बिना जेवणाच जाऊ नये हा त्याचा नियम. या गोष्टी यमुनेसाठी खरं तर नवीन होत्या यमुनेला कारण कधीच घराबाहेर न गेलेली यमुना आज गावाबाहेर एका अनोळखी लोकांबरोबर राहायला आली होती. सासु सासरे ४ दिर व तीन नंनदा. आणि घरी पाहुणे म्हणुन येणारी पण वर्षवर्ष वास्तव करणारे सगे सोयरे. तिचा नवरा घरात सगळयात मोठा समजुतदार खरं तर त्याला खुप आधीपासुनच घरची जबाबदारी मिळाली होती. भावंड लहान पार्वतीबाई कामात वडिल शेती मध्ये मग्न म्हणुन बाकीचे दिशाब बाजारहाट बघत असत. त्याच नाव नामदेव. वयाच्या 18व्या वर्षी वयाने चार -पाच वर्ष लहान यमुनेशी झाले होते. पण बाहेर जबाबदार वागणारा नामदेव यमुनेशी गमतीने अल्लडपणे भांडायचा सुद्धा. मात्र तिच्या साठी देवच तो, अस ती त्याला मनात असे..

योग्य वयात येई पर्यंत यमुना आपल्या सासूबाई कडे झोपायची असा कोणताच संसार सुरू झाला नव्हता नुसती घरी काम करून संध्याकाळी

थकून ती झोपून जायची.. अगदीच नासमज असलेला नामदेव ही कधी तिला काही बोलला नाही.

हळू हळू तिला काम वाढू लागली तिच्या वर सासू सासरे काम टाकू लागले सासरा सरपंच असल्याने दिवसभर चहाच भांड खाली उतरत नसे त्यात ते सगळे चुलीवर करावं लागे चहा इतका होत असे की यमुना जेवणं विसरत असे... आणि काम म्हणजे इतकी की दररोज १५ ते 20 लोकांना जेवण चहा वेगळा. जो जिथ बसला असेल तिथे नेऊन.. आता तिचा परिवार पूर्ण झाला होता. सासु सासरे नवरा व त्याचे चार भावंड आणि तीन बहिणी. म्हणजे 8 भावंड. पहिला नामदेव दुसऱ्या नंबरचा आनंदा, रागीट स्वभाव, यमुनेशी जास्त पटत नसे. कालांतराने त्याचे ही लग्न सुमत्रा नावाच्या मुलीशी झाले. तिचा तेवहा आधार. अजुनही दिवसा मागुन दिवस जात होते पण नामदेवच्या संसाराला सुरुवात झाली नव्हती.

# तु माझा विठुराया मी तुझी रखुमाई

..आणि तो दिवस जिथुन यमुना व नामदेव यांच्या वैवाहिक जिवनाला सुरुवात झाली. आता ती नामदेवा ला ओळखु लागली. त्यांचा संसार तर होताच त्याच बरोबर यमुनेवर ज्या जबाबदाऱ्या होत्या. शंकर वसंता मंगला अशोक अनुसया आता यमुनेला दिवस गेले.. कामात भरच पडत होती काहीच कमी होत नव्हती पण तरी ती हसऱ्या चेहऱ्याने सगळी काम आवरत होती. सगळे दिर लहान लहान असल्याने त्यांच्या अंघोळी पासून तर जेवनापर्यंत सगळं यमुनाच पहायची... महिन्या मागून महिने गेले आणि यमुना बाळंतीण झाली.......

पहिली मुलगी... पण काय माहित का ती जास्त काळ टिकली नाही ती लवकरच जग सोडून निघून गेली....

त्या काळात काय ते सुख दुःख लवकरच पचवून कामाला लागण्याची पद्धत. ती मुलगी का गेली याचा जास्त विचार न करता पुढे सगळी आपल्या कामाला लागली. यमुना दिर आणि नणंद यांना खूप आपुलकीने जपायची तिच्या साठी ती सगळी तिची लेकरेच होती. ती जणू त्या सगळयांची यशोदा.. काही काळातच यमूनेला पुन्हा दिवस गेले.. पावसाळा होता मानून ती घरचे काम आवरून शेतात ही जात होती. तिथून

येऊन सुमित्राला सोबत घेऊन घरची काम ही करत होती.. या वेळेला ही तुला एक गोंडस मुलगी झाली आणि 3 दिवसात ती ही देवा घरी गेली..... या वेळेला ही जास्त विचार न करता पंधरा दिवसातच ती शेतात जाऊ लागली..... यांने शरीरावर काही परिणाम होतात का याची काहीच कल्पना कोणालाच नव्हती. शेतातले सगळी कामं आवरून सोयाबीन काढून घेतले हे सगळं होत असताना एकीकडे तिची पोर. (दिर आणि नणंद )मोठी होत होती ते शाळेत जाऊ लागली होती. त्या उन्हाळ्यात पून्हा एकदा यमूनेला दिवस गेले आणि या वेळेला ही मुलगीच झाली पण ह्या सगळ्या गोष्टी तीन वेळा होऊन से कोणी या होती कडे लक्ष दिले नाही. यमुना सुद्धा या गोष्टीचा हवा तेवढा विचार करत नव्हती

वसंता शंकर अशोक तिला बाई म्हणायचे तिला माया द्यायचे.... तिला हे सगळी स्वतः चे लेकरे वाटत आणि ती त्यांचा तसा सांभाळ ही करत.

सासू बाई नी घरचे किंवा शेतीचे काम यमुनेला आणले तेव्हा पासूनच सोडून दिले होते. असे सगळी कामे सुमित्रा आणि यमुना करत. मग घरी आलेल्या पाहुयांसाठी चहा जेवणं. त्यांच्या राहण्या ची सोय तर कोण कुठे झोपणार इथपर्यंत सगळी काळजी त्या दोघी घेत. सडा टाकने किंवा बाहेरचा मोठा आंगण झाडून काढणे ही सगळी कामं आता सुमित्रा करू लागली होती.

# यमुनेचा मेकअप

तेव्हाच्या स्त्रिया आठवड्यातून एक वेळा केस धुत असे तो दिवस होता आठवडी बाजाराचा.त्या दिवशी कोणी ही शेतात जात नसे. सगळे घरी राहत निवांत पणे अंघोळ करत अगदी दुपारपर्यंत. मग त्या दिवशी वेणी फणी या सगळ्या गोष्टी होत असत. सगळ्या एकत्र येऊन गोष्टी करत एकमेकींना गोष्टी सांगत थोडीफार मजा करत याच एकमेव कारण होत पुरुष मंडळी बाजाराला जात होते. सकाळच्या गाडीने गेले ते संध्याकाळीच परत येत होते. म्हणजे या स्त्रियांना रोज चे कामातून सुट्टीच दिवस स्वतः च्य हक्काचा तो दिवस होता. मग यमुना ही मागच्या आठवड्यात बांधलेले केस वेणी या आठवड्यात काढून ती मातीने धूत होती. कारण त्या काळी माती आजच्या शाम्पूच काम करत असत. मग मातीने केस धुवून ते सुकवून नंतर वेणी घालून डोक्याला मोठा कुंकू लावून थोडा फार आराम करून संध्याकाळच्या कामासाठी पुन्हा एकदा सगळ्या सज्ज होत असत. पावडर आणि लाली नावाची गोष्ट त्यांना कळत नसे आणि ते घ्यायला पैसे ही मिळत नसे.

## यमुनेच्या पिकी बाईच आगमन.....

सन 1973 (सप्टेंबर) यमुनेला चौथ्यांदा दिवस गेले. पण या वेळेस तिने गोगलेबाबा यांची बाधा घेतली होती. तिचे मामा सासरे जे आज रोजी 107 वर्षे वय असून जिवंत आहेत. ( दि.19 जानेवारी ला,) त्या नुसार यमुना ने सगळी पथ्य पाळली. या वेळेला अस काही खास केलंच नव्हत फक्त तेवढं बाधाच एक. त्यात काय तर कोणाच्या घरचं काही खाऊ नये कुठलं पाणी पिऊ नये देवाचे नामस्मरण कराव असा काही सा प्रकार. म्हणजे काय तर सरळ सरळ साफसफाई ठेवणे आणि योग्य आहार घेणे.

आणि या वेळेस म्हणजे च26 जून 1974 ला गोगले बाबांच्या आशीर्वादाने पिकिबाई चां जन्म झाला तीन मुळीनंतर चौथी ही मुलगीच पण या वेळेस ती वाचली. तिला लाडाने सगळे जवळ घेत. तिचे काका आजोबा आजी... नामदेवराव फक्त तिला दुरून पाहत म्हणजे काय तेही तिचा लाड करत पण. त्यांना जरा भीती वाटे लहान मुलीला कसं जवळ घ्यावं.

आता या मोठ्या कुटुंबात एका लहान परी चे आगमन झाले होते शंकर अशोक काही जास्त मोठे नव्हते च.पण त्यांच्या पेक्षा ही लहान कोणीतरी घरात आली होती. प्रचंड लाड होती पिकीबाई चां तीच खरं नाव

सरस्वती. आजोबा खूप लाड करायचे. तिचा आणि सगळे च. नामदेव राव खूप काळजी घ्यायचे यमुनेजवळ तिचा लाड करायला काही जास्त वेळ नसे. पण बाकी घरचे लोक तिची कमी जाणवू देत नसे. हळू हळू पीकिबाई मोठी होत होती.तेव्हा तिच्या आनंद काका ने तिला एक फ्रॉक शिवला होता. आणि अश्या खूपश्या गोष्टी सगळे तिच्या साठी करायचे

यमुना आता तशी अनुभवाने आणि आता वयाने सुद्धा मोठी झाली होती.सगळी कामं घर ती मोठ्या जबाबदारीने ती पार पाडत होती. कधी कधी आनंद आणि सुमित्रा चे भांडण व्हायचे. तर हसत ती दोघांना समजाऊन सांगायची. घरच्या परस्थितीत काही फारसा बदल झाला नव्हता.च सासरे तेवढे नियमा प्रमाणेच चालत होते.

## वसंतासाठी यमुनेची धाव.

पिकिबाई नंतर यमुना व नामदेव यांच्या घरी दुस-यांदा पाळणा हालला. म्हणजेच योगेश चा जन्म झाला. जन्मतः दुखणं सोबत घेऊन आलेला. त्याला सुरुवाती पासूनच दमा होता आधी परिस्थिती आणि आता योगेशच दुखणं हे यामनेची परीक्षा घेतच होते. त्यात वसंताच कॉलेज ला जायची वेळ आली होती. पण नामदेव किंवा घरी कोणालाच हे पटत नव्हते सगळे ह्या गोष्टी साठी हो मनातच नव्हते जेव्हा वसंता नी विचारले तेव्हा जेवणं करून शेतात कामाला ये असा बोलून सगळे शेतात गेले. मंगलाबाई यमुना बाई च्या डोक्यात काही तरी वेगळंच होत तिला काय माहित का वाटल की वसंता नी कॉलेज मध्ये जावं म्हणून सगळयांच्या माघारीच वसंता ला अमरावतीला पाठवलं. जाताना दोन भाकरी आणि जवळ असलेले काही पैसे त्याला दिले. जेव्हा सगळे नको म्हणत होते तेव्हा या अडाणी स्त्रियांना काय सुचलं असावं ते त्यांनाचच माहीत.

पण खरी वेळ तर संध्याकाळ ची होती. वसंता शेतात आला नाही म्हणून नामदेव आणि आनंद त्याला शोधत काड्या घेऊन घरी आली आणि जोरजोरात त्याला आवाज देऊ लागले की कुठे आहे बाहेर ये तू का आला नाहीस शेतात.तर मार खायला वसंता तर नव्हता पण कोणी पाठवलं यमुनेनी

आणि मंगलाबाई नी म्हणून तिला बोलणं खाव लागलं त्याचा काही जास्त विचार तिने केला नाही च. सगळं वातावरण शांत होऊ दिलं आणि मग नामदेव जवळ जाऊन त्याला समजाऊन सांगितलं की करून बघू द्या वसंता ल काही नाही काही झालं तर आहेच ना शेती. तो काहीतरी वेगळं करू पाहतो तर करू द्या की. अस म्हणत तीने नामदेवाचे विचार बदलू पाहिले.

काही काळ का होईल पण नामदेव शांत झाला. सगळं ठीक चालू होत. वसंता ला कधी पैसे मागून तर कधी चोरून अगदी भाकरी मध्ये लपवून पाठवत होती.

असा करत वसंता चे शिक्षण पूर्ण झाले. त्यात मंगलाबाई व यमुनाबाई चा वाटा ही तेवढाच.

## मंगला बाई साठी यमुनेची हाक

तशी मंगला बाई सगळ्यांत समजदार नणंद होती यमुनेची. सगळं आर्थिक नियोजन तिच्या हातात काही काळ होते. मंगलाबाई चे पहिले लग्न जास्त काल टिकले नाही. अगदी. दोन महिन्या तच ती घरी परतली.

मग त्या नंतर तिचा सांभाळ किंवा तिची सोबती यमुना दिवसभर तिला यमुना जपत असे.मंगला बाई ने आपल्या जीवच काई करून घेऊ नये. तिने समजादरिने जगावं. म्हणून यमुना तिच्या मागे पुढे फिरे........

घर सांभाळून पीकीबाई योगेश आणि आता तिसरी मुलगी माला सगळ्यांना सांभाळून सगळी संकट दूर करत होती.

पैसा अजून ही काही खास दिसत नसे

नामदेव स्वतःवर असलेल्या जबाबदारी मुळे चिडका झाला होता. तेवढा तो यमुनेला समजून घेत नसे. कधी तरी तिच्या वर खूप चिडत ही असे. दिवस मागून दिवस चालले होते. आणि मंगला बाई नी किती दिवस असाच जगावं म्हणून तिचे लग्न करायचे ठरवले बोलतो तेवढं सोप्प नव्हत खरं तर मंगला बाई या साठी तयारच नव्हत्या. त्यांना वाटायचे की दुसऱ्या वेळेस आधी सारखं काही झालं तर.म्हणून त्या घाबरत असे. पण त्यांची समजूत काढून महिन्याभराने तिला लग्ना साठी तयार करून यमुना यशस्वी

झाली होती. सोबतच वसंता मोठ्या पदावर जाऊ पाहत होता. असे करत मंगला बाई चे लग्न लावले गेले. काही दिवसाने अजून पुन्हा एकदा यमुनेला दिवस गेले.खर तर आधीच तीन मुले झाली होती. पण असा काही विचार तेव्हा केला जात नसावा. गरजा कमी होत्या त्यामुळे कदाचित. पण त्या मुळे तब्बेती वर परिणाम होत का याचा कुठलाच विचार केला जात नव्हता. त्या काळात काय मने ताप ही येत नव्हता. कसली गरज नव्हती आता सारखे प्रत्येकाला मोबाईल किंवा टीव्ही ही लागत नसे. आहे आणि जेवढे मिळेल त्या मध्ये खुश राहणारे लोक होती गावातच नाटके भजन यातच त्यांचा सगळा आनंद असे आणि करमणूक ही होत असे.

# उन्हाळा.

आता उन्हाळा आला की लोक आधी कूलर घरा बाहेर लावतात कोणी घरात लावतात. कोणी ए सी साठी पैसे जमा करतो तर कोणी थंड ठिकाणी जाऊ पाहतो आपल्या आपल्या परिस्थिती नुसार सगळे आपली सोय लावतात.

पण तेव्हा रस काही नव्हत ऊन कुठून आल आणि कुठे गेलं हे त्यालाच कळत असेल तर त्यालाच माहित यमूनेचा उन्हाळा फक्त चुलीजवळ जायचा का म्हणजे काय विचारता सकाळ ची न्याहारी आवरून लगेच जेवणं बनवायला घ्यायचं सुमित्रा बाहेरच आवरे पर्यंत घरातील सगळं काम यमुना कडे असायचे. सगळा स्वयपांक ती स्वत:करत होती त्यात दोन प्रकार च्या भाज्या मिर्च्या भाजुन वेगवेगळ्या चटणी चे प्रकार राहत आणि सगळी पंगत सकाळी जेवायला बसे त्यात याला हे त्याला हे द्याव लागे. जेवण झाली कि तिथेच बसुन स्वतः जेवन करुन तिथेच ती ढिगभर भांडे घासुन होई पर्यंत कोणी ना कोणी सरपंच म्हणजे सासरे बुवा जवळ येवुन बसे मग काय तीच चुल पेटवुन लगेच त्यावर चहाच भांड ठेवाव लागे. हे होई पर्यत दुपारचे एक वाजुन जात. तर लगेच दुपारच्या वेळेच बघाव लागे. मग काय चुलीतल्या त्याच काड्या पुढे ढकलत दुपार साठी आमरस आणि

पायलीभर भात शिजवावा लागे. ते होईपर्यंत चहा साठी एखादा पाहुना हजर राहत असे आणि मग गोष्टी करे पर्यंत संध्या कालच्या जेवणच येई. पुन्हा तेच चक्र चालू. संध्याकाळी काम उरकायला जेवणं करून ती भांडी आवरायला नऊ वाजून जात. आणि मग अंथरूण दिसले की कधी झोप लागली काळात ही नसे.

दिवसा मागून दिवस जात होते आणि पुन्हा एकदा यमुनेच्या पोटी एका मुलाचा म्हणजेच रघुनाथ ने जन्म घेतला. रघुनाथ ला जस जस समजू लागले तो चंद्राला भित असे

तेव्हा मोठी समजूत आलेली पिकिबाई त्याची समजूत घालत असे. काय माहीत का असे होत असावं त्या पण हे कोणाला काही खास वाटत नव्हत आणि वेगळं ही नाही.

आता वसंता ही मोठा प्राध्यापक झाला.त्याचा काही तेवढं आनंद नव्हताच घरच्यांना. कोणाला काही कळत नसे. त्यात तेव्हा पगार ही कमी असायचा या पेक्षा शेतीत राबव असा सगळ्यांचं ठाम मत त्या लागलेल्या नोकरी पेक्षा शेती मध्ये काम करणाऱ्यांचे जास्त कौतिक होत असे. असे साधे भोळे अडाणी लोक ज्यांना जास्त महत्व मेहनतीला देत असे.आपल्या लोकांत राहून आपले पिढी न पिढी चालत असलेले कामच करावे अशी समजूत

## लहान मंडळीच्या गमती जमती

घरात लहान मंडळी खूप सारी झाली होती त्या मध्ये सुमित्रा आणि आनंद चे दोन मुलं आत्माराम आणि बळीराम यमुना आणि नामदेव चे चार मुलं तसेच अशोक शंकर शोभा बाई आणि सगळ्यात शांत अनुसायाबाई सगळी मंडळी सोबत राहायची मज्जा मस्ती करायची आत्माराम सुद्धा यमुनेच्या अंगावर होता त्याची आईच जणू... असा तो यमुना सोबत राहायचा. यमुना सगळ्यांना दुपारी चां चां जेऊ घालायची आणि रात्री सगळ्यांना दूध गरम करून द्यायची. सगळी आवडीने पित ही असत.कोणाची भांडण झाली तरी यमुना कोणाला खायला हवं असेल तरी तीच काही हवं असेल तरी तीच मजेची गोष्ट ही होती कोणाची कितीही भांडण झाली आणि कोणी कितीही रुसून बसले असेल तरी यमुना मायेने त्यांना समजून सांगत होती. कुरवाळत होती नात्यांचं महत्त्व पटवून देत होती. आणि ती इतक्या प्रेमाने सांगत होती की सगळ्यांना ते आवडत होती. आत्माराम कधीच तिच्या शिवाय जेवायला बसला नाही तिच्या वर सगळ्याच सारखंच प्रेम होत सारखीच आपुलकी. कधी या मुलांचे भांडण जरी झाले तरी सगळी लोक शेवटी एकत्र यायचीच हे तीच प्रेम तिची माया

काही खायचे असेल तर यमुना सगळ्यांना आठवत पण कधीच तिने रागाने कोणाला दूर केलं नाही सगळ्यांनाच प्रेमाने खायला देत होती कोणाला ही आपले आणि परके असा ही जाणीव होऊ दिली नाही तिच्या त्या प्रेमाने सगळ्यांना खूप छान शिकवण तर दिलीच पण सगळ्यांना आज पर्यंत एकत्र बांधून ठेवले आहे तिचा सुगंध आज ही ह्या नात्यात आज ही पाहायला मिळतो.

## यमुनाबाईच लहान पाखरू

एकीकडे यमुना वसंत शंकर अशोक यांना सांभाळत होती तर दुसरी कडे स्वतःच संसार नामदेव राव आणि तिचे आता चार मुले झाली होती पण तरी तिने पाचव बाळ होऊ दिलच. काय तर अडाणी पणा. पण पिकीबाई नंतर कोणाचा लाड झाला असेल तर कैलास म्हणजे या लहान बाळाचा तोपर्यन्त सुमित्रा ला दोन मुलं झाली होती. सासू बाई अजून ही फक्त सगळं बसून पाहत असे कधी काही हात भर ती लावत नसे तब्येत चांगली राहते नसे पण नेहमीच काही नवीन खायला मागत असे. एके दिवशी असाच नेहमी कुलूप लाऊन ठेवलेलं कपाट उघडल तेव्हा शंकर आणि पिकिबाई आम्हाला गूळ दे म्हणून यमुनेच्या मागे लागले होते आणि त्या घाईतच पिकिबाईच डोकं ही फुटलं. आणि आता मार पडेल म्हणून दोघे ही तिथून पसार झाले.

पिकिबाईआता आठवी त शिकत होती म्हणून शंकर काका आणि अशोक काका सोबत रूम करून तालुका ठिकाणी राहायला गेली आणि तिथे आठवडी बाजाराच्या दिवशी आजोबा येऊन एका पाच रुपये देत त्या मध्ये स्टोव्ह साठी घा भाजी पाला आणि पुढं एक आठवडा त्या वर काढावा लागे. मध्ये मध्ये ती सगळी मुलं घरी येई

कैलास सगळ्यात लहान होता तितकाच दुखिरोगी सुद्धा तोपर्यंत दवाखाने समजू लागले होते त्याला नेहमी यमुना व नामदेव दवाखान्यात घेऊन जात मग काय सकाळी जायचं आणि संध्याकाळी पाचची गाडी आली की परत यायचं पण मग मध्ये इतका वेळ काय कराच म्हणून नामदेव यमुना खूपदा चित्रपट पाहायला ही जात आणि तोच त्यांचा सोबत जगलेल्या क्षणां पैकी एक बघता बघता पिकि बाई 10वी झाली होती. तिच्या सोबत. सोबत कधी पास तर कधी फेल होत होत अशोक आणि शंकर जेमतेम बारावी झाले असावे. कैलासच मात्र दुखणं कायम होत. मरणाच्या दारातून कित्येदा तो परत आल होता. दवाखाना मात्र आता करत होते.

शिक्षणाचं इतकं काही खास महत्व नसताना आता ही लेकर शिकू लागली होती रविवारी मात्र शेतात जात.

## यमुनाबाई ची तळमळ.

आता पर्यंत सगळ्यांना सांभाळत यमुने न आणले होते कधी शाळेत न गेलेली यमुना आता सगळं संसाराचा गाडा हाकत होती अनात होती पण आता ही घरची परिस्थिती बेताचीच होती. जी परिस्थिती येईल ती तशी पुढे ढकलून पुढे जायचं आता यमुना बरोबर सगळेच शिकले होते. यमुनेच्या मामासासऱ्यांचे मुल घरी यायचे तेव्हा त्यांना ही सगळी बरोबरी करण्यात तिला धडपड करावी लागत असे. काही खास नाही पण खायला काही नवीन किंवा त्यांना इथे काही जास्त काळ ठेवले तर घरातील सामान कसं जास्त दिवस पुरेल याची चिंता तिला सतत वाटत होती. खूप दा तर घरी पाहुणे येऊन बसत. पण त्यांच्या चहाच्या सोयीसाठी यमुना ला धडपडच करावी लागे पैसे तरी कधीच नसतं मानून शेजारच्या बाई कडे साखर कधी चायपत्ती साठी मागणी करत खूप दा तर शेजारीण तिला शिव्या ही घालत पण हसुन तिच्या कडून जिद्दीनं ने घेऊनच येत होती आणि पाहुण्यांना समजायच्या आत त्याची बरोबरी करत असे. कधी कधी तिला कोणी हातावर पैसे दिले असेल ती तशीच जो तिच्या पदरात असे आणि त्या पैशाच्या ही ती कधी साखर तर कधी चायपत्ती आणायला वापर करत होती. तिने कधी पाहुणे आल्यावर नामदेव ल जाऊन साखर नाही आणि आणून द्या असा धाडस केलेला नव्हता आणि नामदेव आणून ही देत नसे काय करायचं स्वतः कर मला त्यात सामऊन घेऊ नको असा

# वाटसरु

यमुनेच्या गावात कानिफनाथ महाराज यांचं भव्य मंदिर...... त्या मंदिरात ये जा करणाऱ्यांची संख्या ही तेवढी च. होळी च्या दोन दिवस आधी तिथे यात्रा भरते. मंदिर तस गावाबाहेर टेकडी वर आहे पण प्रवेश गावात मधूनच होती त्या मुळे सगळी आजु बाजू च्या गावातील लोक या यात्रेला येतात. तेव्हा ही यायचे तेव्हा आता सारख्या गाड्या उपलब्ध नसायच्या. काही लोक बैलगाडीने काही पायी दर्शनाला यायचे.घर एकदम रस्त्याला लागून असल्याने वाटसरू नेहमीच यमुनेच्या घरी पाणी प्यायचे. सरपंच असल्याने तिच्या सासऱ्याने खूप मोठे मोठे दोन माठ आणून ठेवले होते. पण त्यांना पाणी देण्याचे काम यमुनाच करत असे. सकाळी घरातले काम आवरून पूर्ण दिवस भर कोणाला पाणी तर कोणाला चहा देण्याचं काम ती करत होती.त्यात काही लोक आता नेहमी चे ओळखी चे झाले होते. त्यांना ती जेवणं ही देत असे.ती सतत मानायची की ही लोक दुरून उन्हात चालत येतात आपल्या घरची भाकर भाजी खाल्ली तर मन तृप्त होईल. कानुबा आपल्याला आशीर्वाद देईल. लोकांच्या पोटात दोन घास गेले म्हणजे देवा ला नैवद्य दिले असे तिला वाटत होते. खूप वेळा मंदिर पलीकडे वस्ती असलेले लो जेव्हा मंगरुळपिर चां बाजार करून यायचे तेव्हा त्यांना जबरदस्ती बसून यमुना पाणी आणि चहा देत होती. भलेही तिची

परिस्थिती चांगली नव्हती पण तीच मन खूप शुध्द होत. त्या मुळे लोक घरा समोरून उपाशी जाऊच नये असा तिचा आग्रह असे त्या नादात ती नामदेव चा कल्ला ही खात असे.

खूप वेळा गावात मागायला आलेल्या लोकांना थोडा फार धान्य देऊन त्यांना ही चहापाणी देऊ पाहत असे.त्या पैकी काही मागणारे लोक तिच्या ओळखीचे ही झाले होते.

वाटेत दिसेल त्या माणसाला कसा आहेस दादा कशी आहेस बाई म्हणून ती सगळ्यांना आपल करून घेत होती. खूप लोक तर कधी दिसली नाही तर कुठे गेली म्हणून विचारपूस ही करत होती. आणि काही दिवसाने लोक न तिला बोलता पुढे जाणं टाळत असे.

अनेक वाटसरु तर तिला भेटून मगच मंदिराकडे वाटचाल करत होते. त्यात काही लोक तर गरीब आणि काही लोक अपंग ही होते. त्या सगळ्या रंजल्या गांजल्यांना ती थोडीच का होई ना पण मदत करत होती. कधी तिच्या जवळ पैसे नसायचे पण फक्त गोड बोलूनच ती लोकांना मोहात पडायची. तिला नेहमी लोक जोडायला आवडत असे. विचारपूस करायला आवडत असे. त्या साठी ती दिवस भर उभी राहून त्यांची सेवा करत असे. आणि हे तिने अगदि तीच्या शेवटच्या दिवसापर्यंत केलं होत.

# यमुना बाई चे भावंडं

यमुनेच लग्न झालं तस ती माहेरी खूप कमी जात होती. कारण आईवडिलांकडे आधीच अठरा विश्व दारिद्र्य. त्या मुळे त्यांनाच खायची सोय लागत नव्हती. बहिणी लग्न करून आपल्या आपल्या घरी गेल्या होत्या. यमुना बाई चे दोघे भाऊ आता मोठे झाले होते. काम करू पाहत होते. काही वर्षांनंतर जेव्हा यमुना बाई चे भावंडं थोडफार कमाऊ लागले होते. तेव्हा कधी तरी एके दिवशी यमुना तिच्या माहेरी गेली. या वेळेस भाऊंनी थोडे फार

प्रगती केलेली होती मोठा दुधाचा व्यवसाय करत होता आणि लहान शेती ( दुसऱ्याची) करू लागला होता.त्यामधून थोडे फार परिस्थिती सुधारत आली होती. यमुना खूप कमी वेळा घरी जात होती कारण तिचा कुटुंबाचा गाडा प्रशस्त होता. कालांतराने तिचे आईवडील जग सोडून गेले. आणि आता तीच जाणं अजूनच कमी झालं पण तिचे दोघे भाऊ कधी कधी सावरगावला आपल्या बहिणी कडे येत होते. पण जेव्हा ही यमुना चे भाऊ किंवा बहिणी तिच्या घरी जात यामुनेची सासू खूप राग करत तिला वाटत होते की यमुना आपल्या घरचं काही तिच्या भावंडाना देऊ नये. आणि परिस्थिती चांगली नसल्याने याणूनेला वाटत होत की त्यांना थोडी फार

काही मदत होईल असे तिला वाटत होते पण पार्वती बाई समोर सगळं व्यर्थ. हवी तशी मदत ही तिला करता येत नसे. आणि तिची. झालेली मनाची घालमेल असंच मनात ती तशीच दाबून आपल्या कामाला लागत होती

# पोळा

अख्ख्या महाराष्ट्रात पोळा खूप उत्साहाने साजरा होता. शेतकरी तर आतुरतेने पोळ्याची वाट पाहतो. बैल म्हणजे त्याचे जिवाभावाचे असतात. त्यांना हा दिवस खूप महत्वाचा असतो. तसेच यमुनेच्या घरी आणि गावात सुद्धा पोळा मोठ्या आनंदाने साजरा केला जात होता पुरण पोळी आणि बैलांना साज. त्या काळी मानाचे बैल नामदेव यांच्या बैलांना होता नेहमीच त्याच सरपंच असल्याने आणि गावात प्रतिष्ठित असल्याने हा मान त्यांना मिळत असे. गावात मान सन्मान याला खूप महत्त्व दिले जाते. अश्याच एका पोळयाला ठरल्याप्रमाणे सकाळी बैल चारून पोळा साजरी करायला दुपारी घरी आणली गेली त्यांना चां अंघोळ घालून छान सजवले गेले. मानाचे बैल मानून नामदेव रावने योगेश रघू बळी आणि आत्माराम आणि सगळे लोक सोबत घेऊन बैल हनुमानाचे दर्शनासाठी नेले. तिथून पुढे तोरणाखाली बैल जाणार होते नामदेव व सगळा परिवार सोबतच होता. बैल तोरणाखाली गेली नक्की पण या वेळेस चा मान देण्यास काही लोकांनी नकार दिला. तो निर्णय नामदेव यांना पटण्यासारखा नव्हताच त्यांना काय कोणालाच त्यांचा निर्णय आवडला नव्हता.

म्हणून तिथे मोठ्या प्रमाणात भांडण करुन सगळी राठोड लोक घरी आली. ना कोणी जेवणं करायला तयार होत ना कोणी पूजा करायला. यमुनेला सगळे घरी यायच्या आधीच सगळ समजल होत पण सगळी लोक घरी आल्यावर यमुना पुढे जाऊन काहीच झाल्यासारखं म्हणाली की पूजेसाठी बैल धरा.. सगळे अचंबित झाली कोणालाच काही कळेना काय करते ही बाई हिला काही कळते की नाही... इतके भांडण झाले बैलांना मान मिळाला नाही आणि ही पुजे साठी कशी काय बोलवते.. म्हणून जेव्हा आनंदराव बोलले की आम्ही तिथून मान मिळाला नाही म्हणून निघून आलोय. तेव्हा तेव्हा अडाणी बाई समोर येऊन म्हणाली की माझ्या बैलांना तोरणा खाली मान नाही मिळाला म्हणून काय झाले आपल्या घरी त्यांना नेहमीच पाहायला मान असणार आहे. त्यांच्या आधी आपल्या कोणाच्याच तोंडात घास जाणार नाही. पोळा हा सण चांग्ल्याने साजरा करू या. नाराज का होता इतकं काय झालं मानच मिळाला नाही ना. आणि पुढे ती म्हणाली की आणा पाटावर आणि सगळयांनी थोडा थांबून राग बाजूला ठेऊन सगळयांनी बैलांची पूजा करून पोळा आनंदाने साजरा केला.

# चक्की

कालांतराने हळू हळू का होई ना पण नामदेव आणि घरची परिस्थिती सुधारत होती. पीक पाणी जरा बर होत होत म्हणून एक काहीतरी आधार होईल म्हणून घरी चक्की आणन्याचे ठरले. आणि ठरल्याप्रमाणे काही पैसे घरचे आणि काही उधार घेऊन चक्की आणण्यात आली. पण लाईट चा वांदा.. आनंद थोडा धाडशी होता काहीतरी जुगाड लाऊन त्याने लाईट ही आणली. आणि चक्की चा शुभारंभ ही झाला. एक आठवडा भर काही तरी चक्की ठीक ठीक चालू लागली होती. आता गावात एकच चक्की असल्याने हळू हळू गावातील आणि गावाशेजारील दळण दळायला तिथे येऊ लागली. नामदेव शेत सांभाळत होता शंकर अशोक शिकायला बाहेर होते आणि वसंत नोकरी करू लागला होता त्या मुळे आनंद ने चक्की चालवायला घेतली होती. हळू हळू चक्की ला महिना दीड महिना झाला असेल आणि लाईनमन गावात आला होता. तो गावातील लोकांना लाईन बिल मागत होता. जेव्हा तो चक्की त आला त्याने पाहिले की काही तरी जुगाड करून चक्की चालू होती. आणि आनंद तिथे त्या दिवशी नव्हता. बाकी लोकांना ते लपवता येत नव्हते. अर्थात ते लाईन चोरी मध्ये पकडल्या गेले होते. पण अडाणी असल्याने आपल्यावर केस होईल या भीती ने घरी

जे लोक होती त्या सगळ्यांनी त्या लाईनमन धो धो धुतले. काय तर त्याने लाईट बिल मागू नये आणि त्याच्या वर

आरोप ही लावला की याने आमच्या घरच्या बाई वर हात टाकला म्हनून.... पण या सगळयात कुठेच यमुना नव्हती खरं तर तिला माहित झालं तेव्हा त्याला या सगळयातून सोडवून तिने त्या लाईनमन ला पाणी प्यायला दिले आणि तीच कामच चहा ही दिला. खरं तर लाईनमन का काहीच कळले नाही की का मारल आणि त्यांच्या घरच्या बाई नीच वाचवलं. तो कसाबसा निघून गेला आणि कधीच परतला नाही

## ट्रक आणि गहू

नामदेव आणि यमुनेच्या संसारात आता बदल होत होते. थोड्याफार प्रमाणात ते गहू पीक काढू लागले होते. असाच एकदा शेतातून गव्हाचे पीक काढून घरी आणले होते. गहू थोडे ओले होते त्या मुळे घरासमोर रोड वरच ते उन्हात वाळत घातले होते. आणि जेव्हा संध्याकाळी जेव्हा सगळे मिळून ते पोत्यात भरत होते तेव्हा एक ट्रक तिथून आला आता रोड असल्याने त्याला तिथूनच जावं लागणार होत. आणि त्याने तसच केला,तो तिथून जातांना एका भरलेल्या पोत्याला ट्रकच थोडा धक्का लागला आणि पोत्यात भरलेले गहू खाली सांडले. आणि ट्रक समोर निघून गेला. पण त्या मागे काय झालं हे ट्रक ड्रायव्हर ला काहीच कल्पना नव्हती. पण जेव्हा तो परत आला तेव्हा त्याला ट्रक मधून बाहेर काढून खूप धुतले. कारण तो गहू सांडून गेला होता त्यांना सगळी र राठोड कंपनी रागात होती. याचा अर्थ ती लोक अतिशय वाईट होती असा मुळीच नव्हत फक्त अडाणी होती. गाव आमचं तर आमची सत्ता आणि बाप सरपंच असल्याने त्यांना त्या गोष्टीचा थोडा फार माज असेल कदाचित. पण यमुना मात्र नेहमी सगळं झाल्यावरच तिथे पोहोचली आणि आधी पोहोचली तरी सगळी माणसं तिला काही करूच देत नव्हते. पण शेवटी त्या ड्रायव्हर ला त्यांच्या तावडीतून सोडवून शेवटी त्याला तिथून परत पाठवलं. आणि एकदा पुन्हा घरच्यांना समजाऊन सांगितले.



# यमुना 2.0

## घरची परिस्थिती आता बरीच सुधारली होती.

शंकर मास्तर झला होता अशोक बस कडक्टर झाला होता सगळ्यात शांत स्वभावाची अनुसया अंगणवाडी सेविका झाली होती एकंदरीत सगळं आता पटरीवर आली होत बऱ्यापैकी सगळे आता चांगल्या मार्गी लागले होते. आनंद नंतर शोभा बाई आणि अनुसया यांचे लग्न झाले होते. वसंता आता मोठा प्राध्यापक झाला होता. अडाणी आता सुशिक्षत झाले होते.यमुनाच सगळा परीवार खूप पुढे गेला होता नागपूर पर्यंत यांची मजल गेली होती यमूनेचा मुलगा योगेश ही नागपूर ला शिकत होता. पण एक बदल झाला नव्हता तो म्हणजे यमुनेचे काम तिची चूल तिचा चहा तिची माया तीच प्रेम तिची आपुलकी यात काही बदल झाला नव्हता. आता ही तेवढ्याच प्रेमाने ती सगळ्यांना आधी सारखंच चहा जेवणं आणि सगळे काम करून आता गावातच सासू सासरे यांची सेवा करतच होती यात काहीच बदल झाला नव्हता उलट आता शोभा बाई अनुसया बाई यांचे सासरवाले लोक यमुनेच्या लिस्ट मध्ये वाढले होते त्यांना घरी आल्यावर खुश ठेवण्याची सगळी जबाबदारी स्वतः यमुना घेत असे आता तिच्या कामात जबाबदारीत अजूनच वाढ झाली होती.

## सगळ्यांच्या आवडत्या पीकी बाईच लग्न

घरात सगळे शिकत असल्याने पीकि बाई तेव्हा च्या भाषेत तेरावी पर्यंत शिकायला मिळाले.

त्यानंतर ती वेळ आली जिथे पिकीबाई ला लग्न करून जायची वेळ आली.

मग काय पाहुणे पाहायला येऊ लागली जेमतेम 4किंवा 5 पाहुणे आले असेल पण शिकून असल्याने पिकीबाई च्या आजोबांची खूप इच्छा होती. आणि तसच केलं ही मास्तर बघून पिकीबाईच लग्न लाऊन दिलं गेलं आणि तिथून एका वर्षानंतर वसंतच ही लग्न झाल. त्या नंतर काही दोन वर्षाने माला आणि शंकर आता राहिले होते फक्त आत्माराम बळीराम रघुनाथ अशोक कैलास ही लोक. तिथून सहा वर्षानंतर विश्राम नाईक राठोड यमुनेचे सासरे देवाज्ञा झाले. 15..11..2000 ला. तिथून पुढे मोठा भाऊ म्हणून नामदेव ने सगळी जबाबदरी घेतली होती. पार्वती बाई अजून ही ठणठणीत होत्या.

दिवसामागून दिवस जात होती तसे हळू हळू घरची परिस्थिती ही सुधारू लागली होती बरीच वर्ष नित्य नियमा नुसार चालूच होती.

## 2012

ची गोष्ट सगळं नीट होत असताना चिकन गुनिया नावाची नवीनच बिमारी नावारूपाला आली त्याचे शिकार तुम्ही मी आणि यमुना ही झालीच होती आता पर्यंत यमुना च्च्या दोन नंबरच मुलगा सोडून सगळ्यांचे लग्न झालेले होते सगळी कडे सुख यमुना ल मिळणार होते. चिकन गुनिया काही काळाने नाहीशी झाली ही लोक बरे होत गेले पण यातून यामुनीला सुटका मिळालीच नाही तिला हे राहून राहून हात पाय बोटे सुजणे जाणवत होते पण घरच्या कामामुळे ती दवाखान्यात जात नसे गावातच असलेल्या धुलिया डॉ्टरसाहेब कडे , paracetamol गोळ्या ती घेऊ लागली. याचा काही दुष्परिणाम होईल अशी चाहूल ही लागली नाही. सतत 3,4. वर्ष असाच चालू होते तिला बरं वाटलं की ती काम करत असे आणि बर वाटत नसले की झोपून जात. तिचा जीवनाचा भाग झाल्या होत्या paracetamol.

आता तिच्या मोठ्या मुलीची मुलगी पूजा (मी) तिच्या सोबत राहू लागली होती. तिची कामे करत होती तिला मैत्रीण मानून सोबत होतीच पण तीच दुखणं खूप मोठं होत हे तिने कोणाला जानऊच दिले नाही.कालांतराने तिची प्रकृती खालाऊ लागली होती त्या गोळ्यांचा तिच्या किडनी वर परिणाम होत होत आणि ते जाणवलं ही नाही. खूप दिवस अकोल्याला दवाखान्यात आणले होते.

## मी (लेखिका) पाहिलेली यमुना

काही काळाने तिचे दिर तिला नागपूर सारख्या ठिकाणी दाखाऊ लागले होते तिच्या वर सगळयांचे सारखेच प्रेम होते ती कोणा साठी जवळची किंवा दूर ची नव्हती. सगळयांना तिने एकाच दोरीत बांधून ठेवले होते. मानून सगळे अगदी धाऊन आले होते. दवाखान्यातून डिस्चार्ज मिळाले की काही दिवस ती नागपूर ल च. होती काही दिवस तिला तीच्ये दिरणी तिथे ठेवले होते तिची सेवा करत होते. काही दिवस झाले घरी जायचे असे इच्छा दाखवून ती घरी आली. तबेतीत काही खास सुधारणा नव्हतीच गोळया चालूच होत्या. काही दिवसाने तिच्या ओठातून रक्त येत असल्याचे जाणवले तापेमुळे हे होत असावे असा अंदाज लावत पुन्हा एकदाparacetamole घेत तिने घरची कामे सुरू केले होते. नंतर काही दिवस पुन्हा नागपूर जाण्याचे ठरले. या वेळेस काही तरी विपरीत घडले डॉक्टर ने सांगितले की सतत घेत असलेल्या गोळयांमुळे यमुनेच्या किडन्या वर असर झाला होता. तिने गोष्ट अगदी सहज घेतली आणि तिचा नागपूर प्रवास सुरू झाला अगदी दर महिन्याला ती नागपूर जाऊ लागली त्यात तिची डॉक्टर स्वाती मॅडम सुधा तिच्या गोड स्वभामुळे तिला आई मानायची. डॉक्टर सांगितलं तश्या गोळया चे ती पथ्य पाळू लागली. सगळं ठीक ठीक चालू होत किडन्या हळू हळू जास्त खराब होत होत्या हे स्वाती

मॅडम का कळत होत याच थोडासी ही भीती यामुनाई नी आपल्या चेहऱ्यावर वर जणू दिले नाहीच तिच्या सोबत चे काही प्रसंग आवर्जून सांगावे वाटते 1). प्रसंग 1) शेतात भाली मोठी आमराई होती. सगळी लोक अंबे नेत होती. हे सगळं तिची( यमुना) नात पूजा मंजेच मी एका कोपऱ्यात उभी राहून पाहत होती अजिबात बर वाटत नव्हते की इतक्या प्रमाणत अंबे नेत होती ती लोक त्यात यमुनाच लक्ष पुजाकडे गेलं तेव्हा काहीच बोलली नाही. नंतर जेव्हा पूजा नाराज होऊन जाऊन बसली तेव्हा यमुना तिला महणाली की त्या घडोशी (घरात बिछाना ठेवण्याची जागा) खाली एक शेर (धान्य मोजण्याचे एकक) आन पूजा ल अजूनच राग आला होता कसं बस आजीच ऐकून तिने ते आणलं त्यात तुरी ची डाळ होती. पूजा फुगून बसली तर काय यमुना आजी ने त्यातून एक पिकलेला आंबा काढून पूजा च्या हातात ठेवला आणि पूजा जाम खुश झाली. प्रसंग2). सहसा मुले बाहेर शिकायला जाताना आई भाऊक होते यमुना मुळीच तशी नव्हती.. तिचा शिकण्या साठी पूर्ण पाठिंबा होता. ती अडाणी असून तिला आवड होती. Good morning good night सारखे शब्द ती आता वापरू लागली होती शिकली नसल्याने तिला मराठी चे ही तेवढं ज्ञान नावात ( यमुना बंजारा होती) पण तरी ती तोडली मोडकी हिंदी व मराठी बोलायची त्या वेळेस इतका मोबाईल वापरल्या जात नसे तिच्या कडे landline होती त्यात तिला रीडायाल कसं करायचं ते माहीत होत यमुना इतकी साधी होती की फोन वर बोलताना सुधा

डोक्यावरचा पदर पडू देत नसे तिच्या सोबत सगळयांनाच वेळ घालवायचा होता. तसे सगळे जण जमेल तस करत होते. प्रसंग 4). याच काळात मोठ्या मुलीच्या कुलदैवत सिन्नर तालुक्यात वडांगळी गावात जायचे होते यामुनाई तिथे जायला लगेच तयार झाली आणि तिला तिथे घेऊन जाताना 12 तासांचा प्रवास न झोपता केला तिचा असा समज होता की मला ही दुनिया पहायची आहे काय माहित पुढे मिळेल की नाही तिची ही स्पिरीट बघून कधीच वाईट विचार मनात येत नाही. प्रसंग 5. पुढचा वेळ शेगाविचा राजाच्या घरी जाणे हा होता यमुना इथे जायला पण तयार होती. पूजा नी यावेळेस तिला यमुनेच्या जवळ राहणे पसंद केले तिला हे कळून चुकलं होत की ही आजीसोबत शेवटची ट्रीप असेल. आजीला सगळयांनी डायरेक्ट दर्शन घेण्यासाठी सांगितले पण यमुनेला हे मान्य नव्हतेच. तिने पूर्ण बारी फिरून जाण्याचा निर्णय घेतला आता सगळे सदस्य पुढे जात होते आणि मागे वळून यमुनेला पाहत होते की ती ठीक आहे ना. तिने ही बारी आणि वारी ही पूर्ण केली होती. तीच दुखत होतच पण कुटुंबासह कुठे जायला कधी नकार ती देत नव्हती. प्रसंग.6 नागपूर वारी करताना एकदा बस मध्ये एका बाईने तिला सीट वर बसू दिले नाही तर ती अर्ध्या मराठी आणि हिंदीच वापर करून "तुयी काय सोन्याची कातडी हाय का " महणात जागा मिळवली होती.

## उतरता क्रम

असाच दिवस मागून दिवस जात होते हळू हळू तीच तब्येत चांगली वाईट होत होती.

असाच एक दिवस तिने थंडीच्या दिवसात हरभऱ्याचे भाजी आणण्यासाठी शेतात गेली आणि जाताना रस्त्यात पडली.

तशी उठलीच नाही तिचा पाय तुटला होता कसं बस नामदेव नी तिला वाशिम ल पोहोचवल इकडून मोठी मुलगी पैसे घेऊन दवाखाना मध्ये पोहोचली तिथे यमुनाच 40 टाक्याचे ऑपरेशन केले गेले आणि तिच्या दूखण्यात अजूनच वाढ झाली. जिला फिरायला आवडत तिला एका जागेवर कसं कर्रमेल हा मोठा प्रश्न या वेळेस तिची सासू सुधा खूप दुखावली होती. सगळे अगदीच हतबल झाले होते. तरी ती सगळ्यांसमोर खूप धैर्याने मनात होती की मी ठीक आहे.

आता तिच्या पायात रॉड होता त्यामुळे तिचा पाय सुजलेला राहू लागला काही वेळातच ती पायावर उभी रहली ही पण या वेळी लंगडत तिला त्याच दुःख कमी होत आणि कुठे जाता येणार नाही याची जाणीव होती. आता दिवाळी आली होती.

नेहमी प्रमाणे सगळ्या गोष्टी चालू होत्या. तिला आता जास्त त्रास होत होता ही दिवाळी 2014 ची होती ती जेमतेम 50 किंवा 55 वर्षाची असेल. सगळ्यांनी अगदी आनंदाने साजरी केली ही दिवाळी कारण तीच काय दुखत आहे की तिने जणूच दिलेलं नव्हत. एक फॅमिली फोटो काढू असा गर्दीत कोणीतरी बोलले तेव्हा ती मानली हो काढूनच घ्या कारण पुढच्या दिवाळीत तुम्ही सगळे असाल फक्त मला सोडून सगळे खूप भाऊक झाले स्वतःला सावरत होत फॅमिली फोटो काढून झाला आणि दिवाळी साजरी झाली.

अगदीच दिवाळी चया 5 व्या दिवशी नागपूर वारी होती. या वेळेस ती बस ने न जाता मोठ्या जावई क्या कार ने गेलो होती स्वाती मॅडम ल भेटली. तिचा चेक अप करून स्वाती मॅडम नी तिला dialysis करावं लागेल अश्या बोलल्या आणि ते शब्द तिला आईकु आले तिने स्वाती मॅडम का आधीच विचारून ठेवले होते की याचे परिणाम काय होतात. आता ती वेळ आल्यावर तिने नकार दिला. मला हे करायचे नाही.

आता ती तिथेच तिच्या घरी मंजे दिराच्या घरी आली या वेळेस सगळ्यांना जवळ घेऊन खूप रडली. सगळ्यांना ती का रडत आहे हे आता चांगलेच कळले होते.

सगळे एकमेकांना सावरत होते.

# आणि परतीचा प्रवास सुरू झाला

असा तीच परतीचा प्रवास सुरू झाला गाडीत तिला पूजाच मंजे माझा फोन आला. तिला या वेळेस पूजा जरा रागावून बोलत होती कृष्णा (तिच्या मधव्या मुलाचा मुलगा) झाला तेव्हा पासून तू आमच्या घरी आली नाही आता आहे त्या गाडीतच ये असा आग्रह वजा धमकीच होती.

पण नागपूर ल काय झालं याची कुणालाच चाहूल नव्हती पुजाच मनात ही असा काही आल नव्हतच तिला आजी हवी होती.

पण ही वेळ येणार नाही याची जाणीव कोणालाच नव्हती

तिला घरी न आणता शोभा बाई म्हणजे

यमुना आजी ची नणंद यांच्या घरी ठेवले कारण दवाखाने जवळ होती आता पर्यंत बाहेरून ठीक दिसणारी यामुनाई आता खचली होती.

मंगरूळपिर ला 2 दिवस राहिल्या नंतर मोठी मुलगी आणि दिराचा मुलगा आत्माराम यांनी तिला घरी नेण्याचे ठरवले

त्या आधी आत्माराम यांनी तिला वाशिम वरून कानाच्या डॉक्टर कडे नेऊन आणले होते.

तेव्हा आत्माराम तिला उचलून नेत होता ती मानली" की जाऊ दे रे मला आता देवाघरी".....

हे ऐकून आत्माराम भिन्न झाला होता.

घरी येताच लोक तीला भेटायला येत होती त्यात एक तिचा मोठा जावई होता. त्याच्या पुढे डोक्यावरचा पदर ही तिने खाली पडू दिला नव्हता आणि आज बोलताना तिने बेटा मानून हाक मारली हे ऐकून जावयाच्या लक्षात आले की शेवटचे काही तास किंवा अगदी थोडे दिवस आता उरले आहे

## घरी ती शुक्रवारी ठीक ठीक होती.

शनिवारी 15 /11/2014 (तिच्या सासऱ्याची ही हीच तारीख) दुपारी पूजा आणि तिचे बाबा (यमुना चे मोठे जावई) तिथे येणार होते पण त्या आधीच त्या माऊली ने आपले प्राण सोडले होते.

आणि सगळ्या परिवार बरोबरच सगळ्या गावावर सुधा शोककळा पसाराली होती.

ती सगळ्यांना सोडून गेली होती.

याचे दुख सगळ्यांना होतेच पण तिच्या सासू ल होते ती मनात होती की हे देवा यांमुने पेक्षा मला नेल असत तर काय भिगडल असत तुझ.

# माऊली ची तेर वी

तिला जाऊन 13 दिवस झाले वाटतच नव्हत की ती आता सोबत नाहीये तिची तेरवी होती सगळे दुखत होतेच कसं बस सगळ्यांना जेवायला बसवले गेले नामदेव एका कोपऱ्यात खुर्ची टाकून बसून होताच तेवढ्यात एक डोळ्याने आंध जोडप तिथे आल..... आता जेवायच्या वेळेला ती लोक तिथे आल्याने त्यांना जेवायला बसवले गेले. ते तिथे जेवले. नंतर उठून बोलले की यंमुना कुठे आहे... अन् काय सगळयांच्याच. हृदयाचे ठोके थांबले हे कसे ओळखतात यमूने ला

त्याच्याशी बोलून कळाले की यमुना नेहमी घरात असेल त्या भाजी सह त्यांना जेवायला द्यायची किंवा पोळी भाजी सोबत घेऊन जायला सांगायची या वेळेस जणू हे शेवटच जेवणं करायायलाच तिने बोलावलं असावं जेव्हा त्यांना हे सांगण्यात आले की तुम्ही यमुनेची तेरवी त जेवत आहे तेव्हा त्यांनी हंबरडा फोडला हे कसं झालं.

आज ही तो दिवस आठवला की आंगात शहारे येतात.

सलाम त्या माऊलीला जिने भुकेल्यांचे पोट भरले. तहानलेल्याना पाणी दिले. गरजूंना मदत केली आज ही तिच्या नावाचे गोडवे गात लोक थकत नाही. पूजा आज ही न चुकता तिला रात्री good night म्हणते.

# मित्रहो

## पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!
वाचायला तर हवंच!
www.esahity.com
**9987737237**